॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत डिजिटल आणि सोशल मीडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडीओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन, जनसंपर्क या तीन महिन्यांच्या कौशल्य आधारित व रोजगाराभिमुख सात प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

डिजीटल आणि सोशल मीडिया, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, जनसंपर्क हे चार प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑनलाईन तर कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडीओ एडिटींग, न्यूजपेपर पेजिनेशन हे तीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑफलाईन असणार आहेत. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता १२ वी परीक्षा किमान ४० % सह उत्तीर्ण असणे आवश्यक असून हे अभ्यासक्रम तीन महिन्याच्या मुदतीचे आहेत. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या तासिका फक्त रविवारी होणार आहेत. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, उद्योग सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करता येतील.

हे अभ्यासक्रम पूर्णत: रोजगारभिमुख असून यशस्वी विद्यार्थ्यांना वृत्तपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिन्या, ऑनलाईन पत्रकारिता, सोशल मिडिया, जाहिरात संस्था आदि ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहे. तसेच शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, सोशल मिडीया हँडलर म्हणून कार्य करण्याची देखील संधी उपलब्ध आहे.

तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर (८४०७९२२४०४), डॉ.गोपी सोरडे (९८३४१६६०७२) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत ०२५७-२२५७४३६, २२५७४३८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.विनोद पाटील
कुलसचिव